# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.**(०२०) २६०५०६४१ **ई-मेल आयडी** :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/ निवडणूक/कागदपत्रे/विल्हेवाट/ 1435 /२०२०. दिनांक:- 18/०३/२०२०. 18 MAR 2020

**वाचावे** :-१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७१, ७२ व ७३.

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७१ मधील तरतुदी नुसार निवडणूकीसंबंधीची सर्व कागदपत्रे निवडणूक निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिने इतक्या कालावधीपर्यंत किंवा निवडणूकीसंबंधीच्या विवादाच्याबाबतीत न्यायालयाने आदेश दिला असेल अशा कालावधीपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वत:च्या अभिरक्षेत ठेवणे अनिवार्य आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७३ मधील तरतुदी नुसार नियम ७१ व नियम ७२ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली निवडणूकीसंबंधीची कागदपत्रे सहा महिन्यानंतर किंवा न्यायालयाने/**प्राधिकरणाने** आदेश दिलेले असल्यास सदर आदेशास अधिन राहून नष्ट करण्याची तरतूद आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७१, ७२ व ७३ मधील तरतूदीचे अचुक व पारदर्शकपणे पालन होण्याकरीता कार्यपध्दती निश्चित करणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) मधील तरतूदीनुसार निवडणूका सुरळीपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमातील तरतूदींशी सुसंगत असे आदेश पारीत करण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

त्या अर्थी प्राधिकरण निवडणूकविषयक कागदपत्रांची विल्हेवाट लावणे संदर्भात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण निवडणूकविषयक कागदपत्रांची विल्हेवाट लावतांना अवलंबावयाची कार्यपद्धती खालील प्रमाणे निश्चित करीत आहे.

१. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७१ व ७२ मध्ये निर्दिष्ट निवडणूकीसंबंधीच्या कागदपत्रांची विल्हेवाट करण्यापूर्वी संस्था निहाय विल्हेवाट लावावयाच्या कागदपत्रांची यादी तयार करावी.
२. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सहा महिन्यांचा कालावधी अथवा न्यायालयाने/**प्राधिकरणाने** निदेश दिलेला असेल असा कालावधी पूर्ण झाला आहे असे प्रमाणीत करुन कागदपत्रांची विल्हेवाट करण्याकरीता मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव संबंधीत सहकारी संस्थेचे जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करावा.
३. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडील प्रस्तावानंतर जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी खात्रीअंती कागदपत्रांची विल्हेवाट लावण्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांना लेखी मान्यता प्रदान करावी.

४. जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडील मान्यतेनंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कागदपत्रे नष्ट करण्याची कार्यवाही करावी व कार्यवाहीचा दोन पंचांचे व्यक्तीश: उपस्थितीमध्ये मराठी भाषेमध्ये पंचनामा करावा.

५. पंचनामा लिहून झाल्यानंतर तो संबंधीत पंचांना वाचून दाखवून / वाचायला देऊन तो मान्य असल्याचे नमूद करून दिनांकीत स्वाक्षरी घ्यावी.

६. पंचनाम्यात नियत दिनांक (Date for destruction), अभिलेख नष्ट केल्याची पद्धत, ठिकाण व दिनांकासह पंचाची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. पंचनामा या आदेशासोबत जोडलेला आहे.

७. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त प्रभाग / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊन सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण झालेल्या आणि न्यायालयामध्ये प्रकरण न्यायप्रविष्ठ नसलेबाबत नमूद करून कागदपत्रांची विल्हेवाट लावण्याकरीता दिलेल्या लेखी मान्यतेबाबतची अधिनस्त प्रभाग / तालुका सहकारी निवडणूक अधिकारीनिहाय पंचनामा संकलीत करुन विहित नमुन्याप्रमाणे स्वतंत्र नोंदवही वर्षनिहाय संकलन करुन ठेवण्याची जबाबदारी पार पाडावी.

८. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी उक्त अ.क्र. ७ मध्ये नमूद नोंदवही प्राधीकरणाकडून मागणी केलेनंतर तात्काळ १० दिवसांमध्ये अदयावत स्वरूपात छाननीकरीता / तपासणीकरीता उपलब्ध करून दयावी.

९. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठणापासून पुर्ण झालेल्या तथापि अदयाप निवडणूक विषयक रेकॉर्ड नष्ट करण्यात आलेल्या नसल्याचे प्रकरणांमध्ये उक्त सुचनेप्रमाणे दिनांक ३१.५.२०२० पर्यंत अंतीम जिल्हानिहाय अहवाल सादर करण्याची जबाबदारी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी व्यक्तीश: पार पाडावी.

१०. सदरचा अहवाल तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी थेट प्राधिकरणाकडे सादर न करता त्यांचे जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे मार्फत प्राधिकरणाकडे सादर करावा.

११. निवडणूकीस पात्र असणाऱ्यास सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेस सहा महिने पुर्ण झाल्यानंतर पुढील ३० दिवसांमध्ये, उक्त नमुद सुचनांचे पालन करुनच निवडणूक विषयक रेकॉर्ड नष्ट करण्यात यावे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांचे मान्यतेने.**

(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत,**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

## -: पंचनामा :-

१. सहकारी संस्थेचे नाव - :-
(Name of the Cooperative Society)

२. संचालक मंडळ निवडणूकीचा निकाल दिनांक :-
(Date of Result)

३. निवडणूकीचे रेकॉर्ड नष्ट करण्याची नियत दिनांक :-
(Date for Destruction)

४. जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी
निवडणूक अधिकारी यांचा मान्यता दिनांक :-
(Date of Approval)

५. निवडणूकीचे रेकॉर्ड नष्ट केल्याचा दिनांक :-
(Date of destroyed)

६. निवडणूकीचे रेकॉर्ड नष्ट केलेली कागदपत्रे :- खालीलप्रमाणे कागदपत्रे आमच्यासमक्ष नष्ट करण्यात आलेली आहेत.

१.
२.
३.
४.
५.

७. पंचाचे नांव व पत्ता :-

**दिनांक —**

**ठिकाण —**

**पंच क्र १ चे नाव, पत्ता व स्वाक्षरी -**

**पंच क्र २ चे नाव, पत्ता व स्वाक्षरी -**

**निवडणूक निर्णय अधिकारी यांचे**
**नाव, पदनाम व स्वाक्षरी.**

**-: पंचनामा :-**

| | | |
|---|---|---|
| १. | सहकारी संस्थेचे नाव -<br>(Name of the Co- operativeSociety) | :- |
| २. | संचालक मंडळ निवडणूकीचा निकाल दिनांक<br>(Date of Result) | :- |
| ३. | निवडणूकीचे रेकॉर्ड नष्ट करण्याची नियत दिनांक<br>(Date for Destruction) | :- |
| ४. | जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी<br>निवडणूक अधिकारी यांचा मान्यता दिनांक<br>(Date of Approval) - | :- |
| ५. | निवडणूकीचे रेकॉर्ड नष्ट केल्याचा दिनांक -<br>(Date of destroyed) | :- |
| ६. | निवडणूकीचे रेकॉर्ड नष्ट केलेली कागदपत्रे | :- खालीलप्रमाणे कागदपत्रे आमच्यासमक्ष नष्ट करण्यात आलेली आहेत.<br>१.<br>२.<br>३.<br>४.<br>५. |
| ७. | पंचाचे नांव व पत्ता | :- |

**दिनांक —**

**ठिकाण —**

**पंच क्र १ चे नाव, पत्ता व स्वाक्षरी -**

**पंच क्र २ चे नाव, पत्ता व स्वाक्षरी -**

**निवडणूक निर्णय अधिकारी यांचे**
**नाव, पदनाम व स्वाक्षरी.**

## जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी,------------- यांचे स्तरावरील निवडणूक रेकॉर्ड नष्ट करण्याबाबतच्या नोंदीची सन ------------ ची नोंदवही

| अ.क्र. | सहकारी संस्थेचे नाव व तालुक्याचे नाव | मतमोजणी दिनांक | संस्थेचा वर्ग | निनिअ यांचे नाव व पदनाम | रेकॉर्ड नष्ट करण्याचा दिनांक | रेकॉर्ड नष्ट करताना हजर पंचांचे नाव व पत्ता | मंजूरीकरीता प्रस्ताव सादर केल्याचा दिनांक | मंजूरीपूर्वी नष्ट करण्यात आलेल्या कागदपत्रांची नोंद पंचनाम्यात असल्याची शहानिशा केली होती काय ? | जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचा मान्यता दिनांक | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | |